# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र १११ दिनांक- २२/०४/२०२१

## महागडया धातु मिश्रीत पावडरसाठी ईको कारचे सायलेन्सर चोरी करणा-या आरोपीत यांना पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांना यश.

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिन्यापासुन मारुती सूझुकी कंपनीची ईको कारमधील सायलेन्सर चोरी होण्याचे प्रमाण वाढल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे , मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे पोलीस पथक यांनी तांत्रिक तपास व गुप्त बातमीदार यांचेकडून मिळालेल्या माहितीवरुन आरोपीत नामे १) यूनुस रफिक शेख वय- ४० वर्षे, धंदा- गॅरेज, रा. हनुमान मंदीर नवभारत स्कुल जवळ, कल्याण रोड, नई बस्ती, भिवंडी, ता. कल्याण, जि. ठाणे. २) सलमान मालासाहेब शेख वय -२४ वर्षे रा. सखाराम चाळ वकारभाई यांची रुम, दांडेकरवाडी, कल्याण रोड, नेहरु नगर, नई बस्ती भिवंडी जि.ठाणे. यांना ताब्यात घेतले.

तपासात त्यांचे कब्जात १०,०००/- रु किंमतीचे ईको कारचे तुकडे करुन तोडण्यात आलेले तिन सायलेन्सर मिळुन आले तसेच सदर गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेले मारुती सूझुकी कंपनीची ईको कार तिचा नंबर एम.एच. ०३. ए.झे. ११७८ असा एकुण ३,३०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

आरोपीत हे ईको कार मधील सायलेन्सरच्या कॅटालॅटीक कन्वर्टर (Catalytic Convertor) मधील -होडीयम, पॅलेडीअम, प्लॅटीनम या महागडया धातु मिश्रीत पावडर करीता नमुद वाहनांचे सायलेन्सर चोरी करुन सदर धातुमिश्रीत महागडी पावडर ही इसम नामे- मो. आकीब मुकीम खान रा. बेहराम पाडा, बांद्रा पुर्व, मुंबई यास विक्री करत असल्याचे निष्पन्न होवुन खालील गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | तुळींज | ५२८/२०२१ | भा.द.वी. कलम ३७९ |
| २ | तुळींज | ४१९/२०२१ | भा.द.वी. कलम ३७९ |
| ३ | तुळींज | ५४६/२०२१ | भा.द.वी. कलम ३७९ |
| ४ | माणीकपुर | ६७/२०२१ | भा.द.वी. कलम ३७९ |
| ५ | नौपाडा (ठाणे शहर) | ३२/२०२१ | भा.द.वी. कलम ३७९ |

Scanned with CamScanner

सदर आरोपीत यांनी भांडुप, मुलुंड, कल्याण, उल्हासनगर, ठाणे, कोपरी इत्यादी परिसरात अशाच प्रकारे गुन्हे केले असल्याची माहीती दिली आहे.

नमुद आरोपीत हे पुढील कारवाई करीता तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ४१९/२०२१ भा.द.वी. कलम ३७९ या गुन्हयात तुळींज पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आलेले आहेत.

वरील कामगिरी श्री. डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ उमेश भागवत, सफौ/ अनिल वेळे, पो.हवा/ अशोक पाटील, पो.ना/ प्रदीप टक्के, पो.ना/ मुकेश तटकरे, पो.ना./सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.ना/ मनोज चव्हाण, पो.शि/ अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष-३ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

Scanned with CamScanner